MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

## बीड जिल्हयात सोयाबीन खरेदी केंद्र तात्काळ सुरू करावेत – आ. पंकजाताई मुंडे

बीड (प्रतिनिधी)

शासनाने जिल्हयात आधारभूत किंमत दराने सोयाबीन खरेदी केंद्र तात्काळ सुरू करून सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा द्यावा आणि खरेदीचे अधिकार मार्केट कमिटीला द्यावेत अशी मागणी भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी केली राज्य सरकारकडे पत्राद्वारे केली आहे.

जिल्हयात सोयाबीनचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते, शेतकरी याकडे नगदी पीक म्हणून पाहतात. सध्या जिल्हयात पावसाचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे सोयाबीन पीक खराब होण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. त्यामुळे शेतमाल हंगाम २०२४-२५ साठी जिल्हयात सर्वच ठिकाणी आधारभूत किंमत दराने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करणे आवश्यक झाले आहे, खरेदी केंद्र सुरू करतानाच त्याचे खरेदीचे अधिकार मार्केट कमिटिला देण्यासाठी सरकारने तात्काळ पावले उचलून तमाम शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी आ. पंकजाताई मुंडे यांनी केली आहे.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ अंक –०७ | मंगळवार दि.२४ सप्टेंबर २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -07 | TUESDAY DT.24 SEPTEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# कुंडलिक खांडेची लोकप्रियता कायमच



## जनतेच्या अपेक्षापूर्तीस प्राधान्य- कुंडलिक खांडे

- दोन महिन्या नंतरचा पहिलाच जनता दरबार डबल हाऊसफुल्ल
- खांडेंचा दरबार ; तीच गर्दी, तीच कामाची तत्परता
- जनतेच्या सेवेसाठी कायम प्रयत्नरत – कुंडलिक खांडे

बीड(प्रतिनिधी)

शासकिय कार्यालय, आरोग्य, प्रशासकिय कामे,पोलीस ठाणे आदि कोणत्याही ठिकाणी जी कामे लवकर मार्गी लागत नाहीत त्या कामांना गती देण्याचा पहिला यशस्वी प्रयत्न बीड जिल्ह्यात सरपंच-उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांच्या जनता दरबारातून झाला. दोन महिन्याच्या राजकिय विजनवासानंतर खांडे दि.२३ सप्टेंबर रोजी घेतला पहिला जनता दरबार डबल हाऊसफुल्ल ठरला. खांडेंच्या दरबारातील गर्दी पहिल्या पेक्षा अधिक होती. खांडे यांच्याकडून होणारा कामाचा पाठपुरावा ही तोच आणि सर्वसामान्यांच्या चेहर्यावर काममार्गी लागल्याचेही समाधान तेच होते. जनतेच्या सेवेसाठी मी कायम प्रयत्नरत असतो. यापुढेही त्यांची अपेक्षापुर्ती होत राहिल यासाठी मी अहोरात्र प्रयत्न करील असे कुंडलिक खांडे यांनी सांगितले.

बीड जिल्ह्याच्या राजकिय इतिहासात सर्वात पहिल्यांदा सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी सरपंच, उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी फेब्रुवारी २०२४ पासून दर सोमवारी जनता दरबार घेतला होता. दर सोमवरी सकाळी ११ ते दुपारी ३ दरम्यान श्री.खांडे सर्वसामान्यांच्या अडी अडचणी सोडवण्यासाठी हा जनता दरबार घेत होते. गत दोन महिन्याच्या राजकिय विजनवासानंतर कुंडलिक खांडे हे पुन्हा एकदा सक्रिय झाले असून सोमवार दि.२३ सप्टेंबर रोजी जालना रोडस्थित सरपंच – उपसरपंच संघटनेच्या संपर्क कार्यालयात कुंडलिक खांडेंच्या दरबारात आपआपली प्रश्ने घेवून सकाळ पासूनच नागरिकांची गर्दी होती.दोन महिन्यानंतर भरलेल्या जनता दरबारात ग्रामीण भागासह शहरी भागातील नागरिक मोठ्यासंख्येने दिसून आले. सकाळी ११ ते ३ वेळ असणार्या या दरबाराचे कामकाज सोमवारी सायंकाळी ५ पर्यंत सुरु होते. खांडेंवर असलेल्या विश्वासाने सर्वसामान्य आपले प्रश्न मांडत होते आणि ते प्रश्न सोडवण्यासाठी स्वत: खांडे संबंधित कार्यालयांच्या प्रमुखांशी, प्रशासनातील उच्च स्तरीय अधिकार्यांशी संपर्क साधून प्रश्न मार्गी लावत होते. दोन महिन्यानंतर खांडे यांचा पहिलाच जनता दरबार हाऊसफुल्ल ठरला. या दरबारात नागरिक आपल्या व्यथा मांडल्या. त्यावर खांडे यांनी थेट संबंधित अधिकार्याला फोन लावून जाब विचारत आहेत. प्रश्न तातडीने सोडविण्याचे निर्देश अधिकार्यांना दिले. जी कामे लोक घेवून येतात, त्यांचा शक्यतो त्याच ठिकाणी पाठपुरावा झाल्याचे दिसून आले. नोकरी, बदली, विकास कामे, तक्रारी, कौतुक, आर्थिक मदत या प्रसंगी करण्यात आली. या जनता दरबारात खांडे यांनी प्रत्येकाला भेटून त्यांचे प्रश्न समजून घेतले आणि तात्काळ ते सोडवण्यासाठी संबंधित विभागाला सूचना केल्या.दोन महिन्यानंतर झालेल्या पहिलाच जनता दरबार तुफान गर्दीचा झाल्याबद्दल खांडे यांना विचारले असता ते म्हणाले की, जनतेचे प्रेम व विकासाला मिळणारी चालना, प्रगतीच्या दिशेने असलेले मार्गक्रमण तसेच कार्यकर्ते लोकांबरोबर कायम मिसळणे, वावरत असतो हीच शक्ती आहे.तळागाळातील गरजवंतांना मी न्याय देण्याचा प्रयत्न करत आहेत आणियापुढेही करीत राहील असे खांडे म्हणाले.

# धनंजय मुंडेंची परळी मतदारसंघात आणखी एक शब्दपूर्ती

## सहा शादीखान्यासाठी दीड कोटी रुपये निधी मंजूर



मुंबई (प्रतिनिधी)

परळीचे आमदार तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी परळी मतदारसंघात २०१९ च्या निवडणुकीत दिलेला एक एक शब्द पूर्ण करण्याकडे व पायाभूत सुविधांच्या विकासाकडे एक एक पाऊल टाकत विकासाची घोडदौड सुरूच ठेवली असून त्यांनी मतदारसंघात दिलेल्या आणखी एका शब्दाची पूर्तता करत परळी मतदारसंघातील सहा गावांमध्ये मुस्लिम समाजासाठी शादीखाने उभारण्यास अल्पसंख्यांक विकास विभागाकडून मंजुरी मिळवली असून त्यासाठी दीड निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.परळी वैद्यनाथ विधानसभा मतदारसंघातील बर्दापूर (५० लाख), पोहनेर (२५ लाख), मिरवट (२५ लाख), पिंपळा धायगुडा (२५ लाख), धसवाडी (१५ लाख) आणि खोडवा सावरगाव (१० लाख) याप्रमाणे एकूण दीड कोटी रुपये शादीखाने बांधण्यास निधी मंजूर करण्यात आला असुन, याबाबतचा शासन निर्णय आज निर्गमित करण्यात आला आहे. याबद्दल धनंजय मुंडे यांनी राज्य शासनासह अल्पसंख्याक विकास मंत्री अब्दुल सत्तार यांचे आभार मानले आहेत.

मागील आठवड्यातच शिरसाळा येथे उभारण्यात आलेल्या भव्य शादी खान्याचे लोकार्पण व महिला भवनाच्या उभारणीचे भूमिपूजन धनंजय मुंडे यांच्या हस्ते संपन्न झाले होते. त्याचबरोबर ७ दिवसांपूर्वी धर्मापुरी येथील शादीखाना उभारण्यासही एक कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून परळी विधानसभा क्षेत्रात शहर बायपास सह विविध राष्ट्रीय व राज्य महामार्ग, ग्रामीण मार्ग, प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील शेकडो किलोमीटरचे रस्ते, तीर्थस्थळांचा विकास, विविध शासकीय इमारती, रुग्णालये, पशुवैद्यकीय दवाखाने आदींच्या माध्यमातून दिसणारी विकास कामे केली जात असून पायाभूत सुविधांच्या निर्मानावर धनंजय मुंडे यांनी अधिक भर दिल्याचे मागील काळात दिसून येत आहे.

### लिंबागणेश पंचक्रोशीतील सकल धनगर समाजाच्या वतिने लिंबागणेश येथे

# पाटोदा, मांजरसुंबा,लातुर महामार्गावर रस्ता रोको आंदोलन

धनगर जमातीला अनुसूचित जमाती चे जात प्रमाणपत्र वितरित करण्याच्या आदेशाबाबत शासननिर्णय काढण्यात यावा दि. २३/०९/२०२४ रोजी निवासी जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन देऊन धनगर जमातीला अनुसूचित जमाती चे जात प्रमाणपत्र वितरित करण्याच्या आदेशाबाबत शासननिर्णय काढण्यात यावा यासाठी राज्य भर सकल धनगर समाज महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्यस्तरीय रास्तारोको आंदोलन करण्यात आले यावेळी बीड तालुक्यातील लिंबागणेश पंचक्रोशीतील सकल धनगर समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले, धनगर जमात महाराष्ट्रात पिढयान पिढया मेंढपाळ आणि पुशपालक म्हणून कार्यरत आहे. १९५६ साली अनुसूचित जमातीच्या यादी धनगड ''नावाची जमात दाखल करण्यात आली, ज्यामुळे धनगर जमात गेल्या ६८ वर्षापासून त्यांच्या संवैधानिक हक्कांपासून वंचित राहिला आहे. धनगड नावाची जमात अस्तित्वात नतसानाही ही चूक घडली आहे. महाराष्ट्र महाराष्ट्र सरकारने मुंबई उच्च न्यायालयात तीन वेळा स्पष्ट केले आहे की, धनगड जमात अस्तित्वात नाही,मात्र धनगर जमात अस्तित्वात आहे. त्यामुळे, धनगर जमातीला अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याकरीता महाराष्ट्र



शासनाने त्वरित शासन निर्णय काढणे आवश्यक आहे. धनगड नावाची जमात १९५६ मध्ये आणि त्याआधीही महाराष्ट्रात अस्तित्यात नव्हती, धनगर जमात अस्तित्वात होती आणि आहे. त्यामुळे, धनगड घ्या जागी धनगर जमातीला अनुसूचित जमात म्हणून मान्यता देणे संविधानाच्या कलम ३४२ (१) नुसार आवश्यक आहे. पंढरपूर आणि लातूर येथे मागील १२ दिवसांपासून आमरण उपोषण सुरु आहे. उपोषणकर्त्यांची तब्येत अत्यंत चिंताजनक असून, महाराष्ट्रातील धनगर समाजबांधवांच्या भावना तीव आहेत पंढरपूर येथील आंदोलनादरम्यान तीन व्यक्तींनी आत्महत्येचा प्रयत्न केला आहे. १२ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत, मुख्यमंत्री महोदयांनी धनगर समाजाला अनुसुचित जमातीचे प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी शासन निर्णय काढण्याचे आश्वासन दिले होते आतापर्यंत अनेक सरकारांनी धनगर जमातीच्या केवळ समित्या, अहवाल आणि अभ्यास करून बऱ्याच वेळा दिशाभूल केली असल्याने जमातीमध्ये अजूनही सरकार केवळ दिखावा अथवा वेळ काढुपणा तर करत नाही ना अश्या आवना येऊ लागल्या आहेत. तरी महाराष्ट्र शासनाने गांभीर्याने लक्षात घेऊन लवकरात लवकर कार्यवाही करुन शासन निर्णय जारी करावा, असे आपल्या पत्राव्दारे कळवावे, धनगर जमातीच्या सहनशीलतेचा अंत न पाहता तातडीने आवश्यक निर्णय घेऊन न्याय द्यावा असे धनगर नेते व राष्ट्रीय समाज पक्ष बीड तालुका अध्यक्ष प्रा, बाबासाहेब सापनकर सर ,लिंबागणेश माजी सरपंच बाळासाहेब मुळे,मुळुकचे माजी सरपंच कृष्णा पितळे , जेष्ठ नेते राजे भाऊ गिरे, गणपतराव तागड,लिबांगणेश सरपंच, बालासाहेब जाधव, समाजसेवक डॉ गणेशजी ढवळे, विनायक वाणी,विकी वाणी, रणजित साळुके,नवनाथ मुळे,बंकट लागास, अश्रुबा गिरे रामदास मुळे, अशोक मुळे,बालू,मुळे गणेश मुळे,शिवम कोकाटे, अमोल पितळे, विशाल तागड, सुशील फाटक व लिंबागणेश पंचक्रोशीतील अठरा पगडा समुहातील समाज बांधव या रस्ता रोको आंदोलना उपस्थित होते

# लिंबागणेश येथे धनगर समाजाचा चक्काजाम

लिंबागणेश । प्रतिनिधी

धनगर जमातीला अनुसूचित जमाती (एसटी)चे जात प्रमाणपत्र वितरित करण्याच्या आदेशाबाबत शासन निर्णय काढण्यात यावा या प्रमुख मागणी करत धनगर जमात महाराष्ट्रात पिढ्यानपिढ्या मेंढपाळ आणि पशुपालक म्हणून कार्यरत असुन १९५६ साली अनुसूचित जमातीच्या ( एससी/ एसटी) यादीत धनगड नावाची जात समाविष्ट करण्यात आली.त्यामुळे धनगर जमात गेल्या ६८ वर्षांपासून त्यांच्या संविधानिक हक्कापासून वंचित राहिला आहे.धनगड नावाची जमात अस्तित्वात नसतानाही आणि महाराष्ट्र सरकारने ३ वेळा मुंबई उच्च न्यायालयात ३ वेळा स्पष्ट केले आहे.




त्यामुळे धनगर जमातीला अनुसूचित जमात म्हणून मान्यता देणे संविधानाच्या कलम ३४२(१) नुसार आवश्यक आहे.पंढरपुर आणि लातुर येथील उपोषणकर्ते यांचा आज १३ वा दिवस असुन त्यांची प्रकृती चिंताजनक आहे त्यामुळे समाजाच्या भावना तिव्र आहेत. दि.१५ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी शासन निर्णय काढण्याचे आश्वासन दिले होते.ते पाळण्यात यावे, समित्या, अहवाल आणि अभ्यास यामध्ये दिशाभूल करू नये या मागण्यांसाठी सकल धनगर जमात महाराष्ट्र राज्याच्या वतीने आज दि.२३ सोमवार रोजी सकाळी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील राजे मल्हारराव होळकर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत ढोल ताशाच्या गजरात शिवतीर्थ याठिकाणी रॅली काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावर चक्का जाम आंदोलन करण्यात आले.रास्तारोकोमुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक ठप्प झाली होती परंतु रास्ता रोको दरम्यान रूग्णवाहिकेला रस्ता मोकळा करून देण्यात आला.यावेळी कृष्णा पितळे, बाळासाहेब मुळे, बाळासाहेब सापनकर आणि डॉ.गणेश ढवळे यांची समायोजित भाषणे झाली. निवेदन नेकनुर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, शेख इसाक, पोलिस हवालदार संतोष राऊत, नवनाथ मुंढे, पोलिस अंमलदार उद्धव तांबे,दादा उबाळे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी राजेभाऊ गिरे, कृष्णा पितळे, बाळासाहेब मुळे, शहादेव धलपे,बाळासाहेब सापनकर , गणपत तागड, बालासाहेब जाधव,अनंतकाका मुळे, बालाजी मुळे, सुनिल फाटक, विक्रांत वाणी, विनायक वाणी,शहादेव खोसे, कृष्णा ढास, दादा कदम, अमोल पितळे, अशोक वाणी, अंकुश गायकवाड, बबन ढगारे, संतोष वाणी , पांडुरंग वाणी आदी लिंबागणेश परीसरातील समाज बांधव उपस्थित होते.

## शासनाने धनगर समाजाला अनुसूचित जमाती ( एसटी) प्रमाणपत्र वितरित आदेशाबाबत शासन निर्णय घ्यावा

लिंबागणेश पंचक्रोशीतील सकळ मराठा समाज बांधवांनी धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे ( एसटी) प्रमाणपत्र वितरित करण्याच्या निर्णयाचा शासनाने आदेश काढावेत या मागणीला जाहीर पाठिंबा देताना मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र वितरित करण्यात यावे या मनोज जरांगे पाटलांच्या मागणीसाठी साखळी उपोषणापासुन रास्तारोको ते बीड जिल्हा बंदची हाक आंदोलनात धनगर समाज बांधवांनी जाहीर पाठिंबा दिलेला आहे त्यामुळे सकल मराठा समाजाच्या वतीने जाहीर पाठिंबा देत असल्याचे मराठा सेवक डॉ.गणेश ढवळे यांनी जाहीर सांगितले.



सुर्यकांत जगताप (प्रतिनिधी)

छत्रपती संभाजी नगर, २३ सप्टेंबर २०२४: महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धे अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन केले. या समारंभाचे अध्यक्षस्थान मा. ना. श्री. गुलाबराव पाटील, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, भूषित करत होते. हा कार्यक्रम संत एकनाथ रंगमंदिर, नवीन उस्मानपुरा, पन्नालाल नगर, छत्रपती संभाजी नगर येथे झाला.

या सोहळ्यात २०१९-२० या वर्षातील विशेष राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. आवरगाव, तालुका धारूर, जिल्हा बीड येथील ग्रामपंचायतीने विविध उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली असून त्या माध्यमातून स्वर्गीय आबासाहेब खेडकर पुरस्कार प्राप्त केला आहे. या ग्रामपंचायतीने बंदिस्त गटार प्रणालीद्वारे प्रभावी सांडपाणी व्यवस्थापन, पाऊस पाणी संकलन, जांभूळ प्रकल्प, ५००० पेक्षा जास्त वृक्ष लागवड, ज्येष्ठ नागरिकांसाठी कक्ष स्थापन केले आहे तसेच महिलांसाठी सभागृह उभारले आहे.२०१९-२० या वर्षातील विशेष राज्यस्तरीय पुरस्काराचे मान्यवरांच्या हस्ते स्वीकार करताना आवरगावचे सरपंच अमोल जगताप, जिल्हा परिषद, पंचायत समितीचे अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, ज्येष्ठ नागरिक, युवक मंडळ आणि महिलांच्या सदस्य उपस्थित होते.या पुरस्कारामुळे आवरगाव ग्रामपंचायत, अमोल जगताप सरपंच,गावकऱ्यांचे यांच्यावर सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



रामगिरी महाराज आणि नितेश राणे यांच्यावर अटक कारेवाई करण्याची मागणीसाठी मुंबईत जाणाऱ्या आंदोलकांना बीड शहराच्या वतीने बिसलरी पाणी व चहापानचे नियोजन करण्यात आले होते, यावेळी माजी सभापती तथा राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष खुर्शीद आलम, मतीन भाई देवलेकर,मौ.अखील भाई, खालेद भाई, शरीफ भाई,अलीम सर, रफिक भाई, शहेबाज भाई, जिशान भाई, राजु भाई,आवेज भाई, आदील भाई, शफीक भाई, भाई, जावेद भाई, सोनू भाई वगैरे दिसत आहेत

# संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात धारूर तालुक्यातील थेटेगव्हाण ग्रामपंचायत जिल्ह्यात प्रथम !

## सरपंच भाऊसाहेब चव्हान, उपसरपंच जुबेर भैय्या शेख यांसाह समस्त गावकरिंवर शुभेच्छांचा वर्षाव

**बीड ।प्रतिनिधी**

**संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान २०२३-२४ या स्पर्धेत जिल्हाभरातील शेकडो ग्रामपंचायतने सहभाग नोंदवला होता. धारूर तालुक्यातीलथेटेगव्हाण ग्रामपंचायतने या स्पर्धेत आपला सहभाग नोंदवला होता.नुकत्याच झालेल्या जिल्हास्तरीय तपासणीत जिल्हाभरातून थेटेगव्हाण ग्रामपंचायत प्रथम गुणांकासह संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात अव्वल आली आहे. थेटेगव्हाणचे सरपंच भाऊसाहेब चव्हान, उपसरपंच जुबेर भैय्या शेख ,ग्रामसेवक ,ग्रामपंचायत सदस्यआणि गावकऱ्यांना जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाबद्दल सर्वस्तरातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.**

सध्या अनेक ठिकाणी स्वच्छते अभावी रुग्णसंखेत वाढ होत आहे.अनेक ग्रामपंचायतमध्ये स्वच्छतेलाविशेष महत्त्व दिले जात नसल्यानेत्या-त्या गावात प्रचंड मोठ्या प्रमाणावर रोगराई आणि दैनंदिनसमस्या उद्भवत आहेत. यामुळे राज्य शासनाकडून संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान ही योजना राबवत ग्रामीण भाग स्वच्छ आणि समृद्ध करण्यासाठी शासन स्तरावरून प्रयत्न सुरु असतात. जिल्हाभरातील शेकडो ग्रामपंचायत या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवतात परंतु अंतिम स्पर्धेपर्यंत काही मोजक्याच ग्रामपंचायत या स्पर्धेत टिकूनराहत यशस्वी होतात. याच पद्धतीने घेण्यात आलेल्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान स्पर्धेतधारूर तालुक्यातील थेटेगव्हाण या ग्रामपंचायतने

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छतासहभाग घेतला होता. गावचे सरपंच भाऊसाहेब चव्हाण यांनी सर्वग्रामपंचायत सदस्यांना गावकऱ्यांना विश्वासात घेऊन ग्रामस्वच्छतेचाविचार बोलून दाखवत ही स्पर्धा जिंकायची आहे, फक्त स्पर्धा जिंकायची नसून गावकऱ्यांच आरोग्य सुदृढ राहण्यासाठी प्रत्येक समस्येवर मात करण्यासाठी आरोग्य सक्षम असले पाहिजे त्यासाठी स्वच्छता महत्त्वाची असल्याचं गावकऱ्यांना पटवून दिले आणि यास्पर्धेत सहभाग नोंदवत अंतिम टप्प्यापर्यंत थेटेगव्हाण ग्रामपंचायत या स्पर्धेत टिकून राहिली. नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या या जिल्हास्तरीय सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत निवडीमध्ये थेटेगव्हाण ग्रामपंचायतने जिल्हाभरात बाजी मरत अव्वल क्रमांक पटकावून संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सन २०२३-२४ या स्पर्धेची जिल्हास्तरीय तपासणी झाल्यानंतर



विशेष पुरस्कार प्राप्त प्रथम द्वितीय आणि तृतीय ग्रामपंचायत निवडण्यात आल्या. या मध्ये थेटेगव्हाण ग्रामपंचायत ने प्रथम क्रमांक पटकावल्याने सर्व स्तरातून सरपंच भाऊसाहेब चव्हाण, उपसरपंच जुबेर शेख तसेच गावकऱ्यांवर शुभेच्छा दिल्या जात आहेत.

ही योजना यशस्वी करण्यासाठी सरपंच भाऊसाहेब चव्हान, उपसरपंच जुबेर भैय्या शेख ,ग्रामसेवक शिंदे मॅडम, युसुफ शेख यांनी विशेष प्रयत्न केले . तसेच दिलीप हरणावळ, शमीम शेख, बाबासाहेब गित्ते, खाजा शेख, अजर शेख, वशीम शेख, बलभिम हरणावळ, अमोल गित्ते,विलास अंडिल, अनंत अंडिल, आयुब शेख, अनिस शेख,बाबु बर्डे, विक्रम फुटाणे, राजेभाऊ माळी, सुखदेव गायकवाड, विष्णू भालेराव व समस्त गावकरी मंडळी चे सहकार्य लाभले.

या स्पर्धेचे नियम आणि महत्व समजावून सांगण्यासाठी गटविकासअधिकारी संतोष वंगवडे तसेच विस्तार अधिकारी जिल्हा परिषदेतील अधिकारी कर्मचारी यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. गावकरीही सहकार्य करतात, त्यामुळे संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातील जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाचे बक्षीस आम्ही मिळवूशकलो असे सरपंच म्हणाले. यानंतर राज्यभरात थेटेगव्हाण ग्रामपंचायत कशी सर्वोत्कृष्ट आणता येईल यासाठी आम्ही प्रयत्न करणार असल्याचे सरपंच भाऊसाहेब चव्हाण यांनी सांगितले.

# धनगर आरक्षणासाठी परळीतील ईटके कॉर्नर येथे तासभर रास्ता रोको आंदोलन ; वाहनांच्या लागल्या रांगा

## सरकारने तत्परता न दाखवल्यास उग्र आंदोलनाचा दिला इशारा

परळी ।प्रतिनिधी

पंढरपूर , लातूर , नेवासा या ठिकाणी उपोषणाला बसलेल्या धनगर जमातीच्या उपोषणकर्त्यांना पाठिंबा म्हणून धनगर आरक्षण अंमलबजावणी एसटी प्रमाणपत्र मिळण्यासाठी आरक्षणाच्या हक्कासाठी धनगर जमातीच्या वतीने परळी-वैद्यनाथ येथील ईटके कॉर्नर येथे तासभर रास्ता रोको आंदोलन केले. सरकारचा जाहीर निषेध नोंदवत घोषणा दिल्या. परळी-वैद्यनाथ येथील ईटके कॉर्नर आंदोलकांनी बीड -परभणी-नांदेड महामार्ग रोखून धरला. या रास्ता रोकोमुळे मोठी वाहतूक कोंडी होऊन वाहनांच्या रांगा लागल्या. यामुळे काही काळ वाहतुक खोळंबली होती. धनगर आरक्षण प्रश्नी सरकारने तत्परता न दाखवल्यास उग्र आंदोलन करण्याचा इशारा धनगर समाजचे युवा नेते शिवदास बिडगर व आदोलकांनी दिला आहे.

आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता धनगर जमातीला एसटी या प्रवर्गातून आरक्षण




द्यावे. या प्रमुख मागणीसह पंढरपूर, लातूर व नेवासा येथे सुरू असलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी संपूर्ण राज्यभर धनगर समाजाचे नेते आ. गोपीचंद पडळकर यांच्या आव्हानाला पाठिबा देत रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. तसेच या सरकारने तात्काळ मागणीचे परिपत्रक काढावे या मागणीसाठी अंदोलकांनी जोर धरला. समाजाचा अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गाची अंमलबजावणी करून त्यांना आरक्षण देण्याची मागणी करत रस्त्यावर बसून आंदोलन केले . आम्ही राज्य सरकारकडे नवीन काहीही मागत नाही. आम्हाला फक्त आमचा हक्क हवा आहे जो भारतीय संविधानाने दिलेला आहे आणि तो म्हणजे एसटी प्रवर्गातून आरक्षण,आम्ही सरकारला विनंती करतो की आमच्या संयमाची परीक्षा घेऊ नका. उशीर झाल्यास आम्हाला आंदोलन अधिक तीव्र करावे लागेल आणि परिणामास सरकार जबाबदार असेल. वर्दळीच्या रस्त्यावर सुमारे एक तास हे आंदोलन चालल्याने परळी-वैद्यनाथ येथील ईटके कॉर्नर येथे दोन्ही बाजूंची वाहतूक कोंडी झाली होती. तहसीलदार यांना समाज बांधवांनी आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी धनगर समाजाचे युवा नेते शिवदास बिडगर, विकास बिडगर, दिलीप बिडगर, माऊली गडदे, भिवा बिडगर, विश्वनाथ देवकते, चंद्रकांत देवकते, भिमराव सातपुते, कमलाकर बिडगर, माऊली धायगुडे, मुंजा फुके, प्रविण बिडगर, लक्ष्मण कावळे, कपिल गाडेकर, नवनाथ दाणे, दादाराव गडदे, महादेव हाके, शाम सरवदे, गणेश देवकते, गोविंद यमगर, अंगद देवकते, रामभाऊ कोपणर, महादेव गडदे, चंद्रकत बिडगर, गोपाळ बिडगर, शिवाजी कुकर, सुग्रीव बिडगर, शाम सरवदे, परमेश्वर वैद्य, श्रीहरी कामाळे, हनुमंत कामाळे, व्यंकटेश हरणावळ व सकल धनगर समाज परळी-वैद्यनाथ जिल्हा बीड यांनी केले आहे. तसेच बंजारा समाजाचे युवा नेते बाळासाहेब (पपू ) चव्हाण व माळी समाजाचे नेते विलास आढाव यांनी आरक्षनास पाठींबा दिला.

# बीड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला लोकनेते विनायकराव मेटे यांचे नाव

बीड (प्रतिनिधी)

मंत्रालयात आज पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील विविध जिल्ह्यात असलेल्या १४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हणजे आयटीआय यांचे नामकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार या महाविद्यालयांना महापुरुषांचे व संबंधित जिल्ह्यात योगदान दिलेल्या व्यक्तींचे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाने १४ आयटीआय यांचे नामकरण करुन १४ महान व्यक्तींची नावेदेखील या आयटीआय संस्थेसाठी देऊ केली आहेत. यामध्ये बीडमधील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांचे नाव देण्यात आले आहे.लोकनेते विनायकराव मेटे यांनी आपल्या हयातीमध्ये विद्यार्थ्यांसाठी अनेक लढे उभे केले. बीड मधील शासकीय आयटीआय महाविद्यालयाला नेहमीच त्यांनी सहकार्याची भूमिका ठेवली होती या ठिकाणी असलेल्या वस्तीगृहाचे नूतनीकरण, पिण्याचे पाण्याची व्यवस्था याबरोबरच अनेक समस्या सोडवण्याचे काम त्यांनी केले होते. त्यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या कार्याला स्मरून

**बीड आयटीआय ला लोकनेते विनायकराव मेटे यांचे नाव**
**राज्यमंत्रिमंडळ बैठकीत निर्णय..**



आज राज्य सरकारने बीड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला लोकनेते विनायकराव मेटे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे नामकरण करण्यावर शिक्कामोर्तब केला, यानंतर शिवसंग्रामच्या कार्यकर्ते, पदाधिकारी व लोकनेते विनायकराव मेटे यांच्यावर प्रेम करणा-या चाहत्यांनी एकत्र येत शिवसंग्राम भवन येथे आनंद व्यक्त केला आणि लोकनेते विनायकराव मेटे यांच्या स्मृतिस्थळी जाऊन आदरांजली अर्पण करत अभिवादन केले. याप्रसंगी शिवसंग्रामचे प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे,शहराध्यक्ष सुहास पाटील मनोज जाधव, सचिन कोटुळे शेषराव तांबे,डॉ. राजेंद्र बंड,योगेश शेळके,सुनील कुटे, ज्ञानेश्वर कोकाटे, हनुमंत पवार,मच्छिंद्र कुटे, शेख आबेद, अक्षय माने, राजेंद्र आमटे,अमजद पठाण, शेख लालाभाई,,शैलेश सुरवसे, हरिश्चंद्र ठोसर, प्रशांत डोरले, राहुल शाहगडकर ,मुकुंद गोरे,राजेश माने,गणेश धोंडरे,कैलास शेजाळ,गणेश साबळे, विजय सुपेकर,सुहास मेटे,कुंदन गायकवाड,हरीश शिंदे,

# होम मिनिस्टर चंपावतीसम्राज्ञी खेळ पैठणीचामधून बीडकर माता-भगीणिंच्या विविध गुणांचे दर्शन

## भर पावसात देखील महिला भगिनींची बालाजी मंदिरात अलोट गर्दी

बीड (प्रतिनिधी)

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या सहा दिवसापासून सुरू झालेल्या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी या कार्यक्रमाला पहिल्या दिवसापासूनच महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळू लागला आहे. आजही पाचव्या दिवशी शहरातील बालाजी मंदिर मंगल कार्यालयात महिलांनी अलोट गर्दी पहावयास मिळाली.

माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून काकू- नाना प्रतिष्ठान आयोजित होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीचा हा कार्यक्रम बीडच्या प्रभाग क्रमांक पाच बालाजी मंगल कार्यालय आंबेडकर चौक जुना मोंढा रोड बीड या भागातील महिलांचा मोठा प्रतिसाद मिळाला, या स्पर्धेचे उद्घाटन सौ. मीनाताई चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महिला आघाडीच्या अध्यक्ष सौ.जयश्रीताई विधाते, माजी सभापती सौ.उषाताई सरवदे, सौ. प्रेमलताताई चांदणे, सौ.सविताताई खवतड, सौ.कीर्तीताई चव्हाण, सौ.रूपालीताई पवार, डॉ.अंजलीताई पवार, सौ.उपरेताई, सौ.भारतीताई राजेश क्षीरसागर, सौ.कीर्तीताई पांगारकर, सौ.अर्चनाताई पांगारकर प्रमुख महिलांच्या उपस्थितीत या स्पर्धेचे उद्घाटन झाले. होम मिनिस्टर स्पर्धेला महिलांनी पाण्या पावसाची तमा न बाळगता व्यस्त संसारातून आपल्या आनंदासाठी, मन रिजविण्यासाठी या स्पर्धेला उस्फूर्त सहभाग नोंदविला.

होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीचा ही स्पर्धा प्रसिद्ध निवेदक सुरेश साळुंखे यांच्या खुमासदार शैलीत पार पडली. या स्पर्धेचा अंतिम निकाल प्रथम पैठणी विजेती महिला सौ.रेणुका सुनील बनसोडे या ठरल्या, द्वितीय बक्षीस इमिटेशन ज्वेलरीच्या मानकरी सौ.वैष्णवी परमेश्वर पवार, तृतीय बक्षीसच्या मानकरी सौ.प्रतीभा गोविंद पवार या ठरल्या तर उर्वरित सात महिलांना आकर्षक गिफ्ट हॅम्पर देण्यात आले. यामध्ये सौ.शिवगंगा नंदकिशोर पवार, सौ.जान्हवी प्रदीप तुसंबळ, सौ.प्रियंका सचिन लोणकर, सौ.सरोज हरीश कुलकर्णी, सौ.अंबिका किरण भुते, सौ.पूजा गणेश वाघुले, सौ.यशोदा अशोक बोडगे या महिला ७ ऑक्टोबर रोजी होणार्या




अंतिम फेरी करिता या सर्व महिलांची निवड झाली. मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिसरातील कार्यकर्ते पदाधिकारी, नगरसेवक व नागरिक यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास महिला भगिनी हजारोच्या संख्येने उपस्थित होत्या.

# आझाद मैदानावरील हुंकार आंदोलनास मराठवाडा शिक्षक संघाचा पाठिंबा

मुंबई / प्रतिनिधी

निकषपात्र विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळा, वर्ग व तुकड्यांना घोषित टप्पावाढ अनुदान देण्यात यावे यासाठी मुंबई येथे आझाद मैदानावर दि.१६ ऑगस्ट पासून सुरू आसलेल्या हुंकार आंदोलनास मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाठिंबा दिला आसल्याची माहिती संघटनेचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

अघाव यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, गेली वीस-बावीस वर्षांपासून शिक्षक विनावेतन इमानेइतबारे ज्ञानदानाचे कार्य करत आहेत. अनुदान व टप्पा अनुदानासाठी गेल्या दीड महिण्यापासून राज्यातील शिक्षक मुंबई येथे आझाद मैदानावर हुंकार




आंदोलन करत आहेत.त्याची दखल अद्याप पर्यंत शासन व प्रशासन कर्त्यांनी घेतली नाही. त्यामुळे शिक्षकांत त्यांच्या विषयी प्रचंड असंतोष व चीड निर्माण झाली आहे. शासन व प्रशासनाने या आंदोलनाची दखल घेऊन त्यांच्या न्याय मागण्या तात्काळ मान्य कराव्यात यासाठी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव यांनी आंदोलनास भेट देऊन जाहीर पाठिंबा दिला आहे. व या आंदोलनाची शासन व प्रशासन कर्त्यांनी तातडीने दखल घेऊन त्यांना न्याय मागण्या मान्य कराव्यात अन्यथा मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सुर्यकांत विश्वासराव यांनी दिला आसल्याची माहिती बंडू अघाव यांनी दिली आहे.




# विभागिय सांस्कृतिक स्पर्धेमधे एकलव्य विद्यालय अजमेरसौंदाणे चे घवघवित यश

## विविध एकोणविस स्पर्धा प्रकारात प्रथम क्रमांक

माजलगाव (प्रतिनिधी)

राष्ट्रीय आदिवासी छात्र शिक्षा समिती नवी दिल्ली व आदिवासी विकास विभाग म. रा. यांच्या निर्देशानुसार आयोजित विभागिय सांस्कृतिक स्पर्धांमधे एकलव्य मॉडेल स्कुल अजमेर सौंदाणे ने च्या विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक अशी कामगिरी करुन प्रथम क्रमांकाची एकुण एकोनविस बक्षीसे पटकावीली व राज्य फेरीसाठी पात्र झाले.दरवर्षी प्रमाणे याही वर्षी या स्पर्धेमधील यशाची उज्वल परंपरा कायम राखली.

या स्पर्धेचे आयोजन दि. १३ व १४ सप्टेंबर दरम्यान एकलव्य विद्यालय शिंदेदिगर येथे करण्यात आले होते. ही शाळा सध्या अजमेर सौंदाणे येथिल विद्यालयाच्या ईमारतीमधेच भरत आहे.या स्पर्धेमधे नाशिक विभागातील नऊ विद्यालयांनी सहभाग नोंदवला होता. या आयोजित स्पर्धेत समुह गीत, आदिवासी वाद्य, वकृत्व, वादविवाद स्पर्धा, क्रीएटीव रायटींग, गीतगायन, नृत्य,चित्रकला, आदिवासी शिल्पकला, आदी स्पर्धेत एकलव्य अजमेर सौंदाणे शाळेतील विद्यारथ्यांनी विविध कलागुणांचा अविष्कार करत एकोणविस प्रकारात प्रथम क्रमांक पटकावुन राज्यपातळीसाठी पात्र झाले आहेत. या स्पर्धांचे

विद्यालयाचे प्राचार्य सुरेश देवरे व प्राचार्य प्रशांत सावळे यांनी उत्कृष्ट नियोजन केले. या स्पर्धा तयारीसाठी राजु गोळेसर, डॉ. वैशाली ताठे, मयुरी राजुरकर संगित शिक्षीका,प्रशांत आहेर, संगिता मोरे, संतोष जगताप,गणेश गायसमुद्रे, शितल जाधव, सारीका घाडगे, अक्तर पठाण, स्वप्निल सुरवसे, तारसिंग, अभय भांगे, शिवशंकर कोंडागोरला, स्नेहा कोल्हे, नारायण चौधरी , रीतुकुमारी,शारदा वाघ, पारुल ओहलान, सुरेश पवार, धवल मेश्राम, आनंद दहीकर आदिंनी परीश्रम घेतले. या यशाबद्दल सर्वत्र शाळेचे

# तर पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, पडळकर आणि भुजबळांनाही इंगा दाखवू; ओबीसी आंदोलकांचा नेत्यांनाच इशारा



आमच्या उपोषणामुळे वडीगोद्री येथील स्थानिक नागरिकांची गैरसोय होते. त्यामुळे मी दिलगिरी व्यक्त करतो. जरांगे एक वर्षापासून या रोडवरून जातात आणि अंतरवली सराटीच्या लोकांना वेठीस धरतात. जरांगे गावात उपोषण करतात. त्यांच्या गावात आम्ही गेलो नाही. तुमच्या उपोषणाला त्रास होईल असा आमचा एकही कार्यकर्ता वागला असेल तर आम्हाला सांगा, असं आवाहन ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केलं आहे. तर पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, पडळकर आणि भुजबळांनाही इंगा दाखवू; ओबीसी आंदोलकांचा नेत्यांनाच इशारापंकजा मुंडे, धनंजय मुंडे, गोपीचंद पडळकर आणि छगन भुजबळ या ओबीसी नेत्यांनी आंदोलनाकडे पाठ फिरवल्याने समाज आक्रमक झाला आहे

एकीकडे मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन सुरू केलेलं असतानाच ओबीसी समाजही आंदोलन करत आहे. ओबीसी समाजातील काही कार्यकर्त्यांनी आमरण उपोषण सुरू केलं आहे. जालन्यातील वडीगोद्रीत हे उपोषण सुरू आहे. उपोषणाचा पाचवा दिवस असूनही प्रशासनाने हालचाली सुरू केलेल्या नाहीत. त्यामुळे ओबीसी बांधव आक्रमक झाले आहेत. विशेष म्हणजे ओबीसी नेत्यांनीही या आंदोलनाकडे पाठ फिरवली आहे. पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, गोपीचंद पडळकर आणि छगन भुजबळ या ओबीसी नेत्यांनी आंदोलनाकडे पाठ फिरवल्याने समाज आक्रमक झाला आहे. दोन दिवसात हे ओबीसी नेते आंदोलनाच्या ठिकाणी आले नाही तर त्यांना निवडणुकीत इंगा दाखवू, असा इशाराच या समाज बांधवांनी दिला आहे.

लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांना समर्थन म्हणून गेवराई येथून ओबीसी समाज बांधवांनी मोटरसायकल रॅली काढली होती. सुरुवातीला सोलापूर- धुळे या राष्ट्रीय महामार्गावर चक्काजाम करण्याचा प्रयत्न झाला. त्यानंतर ओबीसी आंदोलकांनी आंदोलन स्थळापर्यंत रॅली काढली. यावेळी शरद पवार यांच्यासह सत्ताधाऱ्यांविरुद्ध घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी पोलिसांनी चक्काजाम करणाऱ्यांना पांगवले. यावेळी या आंदोलकांनी ओबीसी नेत्यांवरच आपला रोष व्यक्त केला. दोन दिवसात पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, गोपीचंद पडळकर आणि छगन भुजबळ आंदोलनाकडे आले नाही तर त्यांना निवडणुकीत इंगा दाखवू, असा इशाराच या आंदोलकांनी दिला आहे.

महिला एकवटल्या

दरम्यान, वडीगोद्रीमध्ये ओबीसी आरक्षण बचावासाठी लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांचं आमरण उपोषण सुरू आहे. त्यांच्या उपोषणाचा आजचा पाचवा दिवस आहे आणि याच उपोषणाला भेट देण्यासाठी आता दिवसेंदिवस गर्दी वाढताना पाहायला मिळतेय. परिसरातील महिलांनी समर्थन म्हणून आज रॅली काढत उपोषण स्थळी येत पाठिंबा दिलाय. यावेळी महिलांनी जोरदार घोषणाबाजी केली.

वेशीतच आडवा

सरकार सध्या निवडणुकीच्या तिकीट वाटपामध्ये व्यस्त आहे. त्यामुळे तमाम ओबीसी बांधवांनी आता सरकारकडून कुठली अपेक्षा करायची नाही. येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत वेशीत घोडा अडवायचा. ज्यांना ओबीसीची मते हवेत अशा सर्वच पक्षांच्या प्रमुखांना वेशीत आडवायचं आहे. धनगर बांधवांच्या मागणीला माझ्या शुभेच्छा आहेत. कधीकाळी मी देखील धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे अशी मागणी केली होती. एसटी आणि ओबीसीची लढाई ताट वाचवून आपल्याला पूर्ण करायची आहे. ओबीसी आरक्षण वाचवणं तितकच महत्त्वाचा आहे, असं लक्ष्मण हाके म्हणाले.

आम्ही बांगड्या भरायच्या का?

धनगर समाजाला एसटीतून आरक्षण कोण देईल हे अद्याप माहीत नाही. ही अंधारातली गोष्ट आहे. त्यामुळे धनगर समाज बांधवांनी एसटीची लढाई लढलीच पाहिजे त्याच सोबत ओबीसी आरक्षण देखील वाचवण्यासाठी पुढे आले पाहिजे. मनोज जरांगे हे सलाईन लावून उपोषण करत आहेत. असलं उपोषण मी कधीच पाहिलं नाही. सरकार जरांगेच्या तालावर नाचत आहे. जरांगे तुमच्यासाठी आम्ही हा रस्ता मोकळाच ठेवला होता. तुमचे चेलेचपाटे तुमच्या सांगण्यावरून येथे येऊन शिवीगाळ करतात. अर्वाच्य हावभाव करतात. गाडी फास्ट घेऊन येतात. आम्ही आणखीन बांगड्या भरूनच बसायचं का? तुम्हाला रस्ता पाहिजे असेल तर गप्प आणि गुमान इथून जायचं होतं, असं हाके म्हणाले.

# जिल्हा न्यायालयातील परिसराची स्वच्छता करुन स्वच्छता ही सेवा अभियान साजरे

बीड (प्रतिनिधी)

दिनांक २ ऑक्टोबर २०२४ रोजी महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १७ सप्टेंबर २०२४ ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत स्वच्छता ही सेवा हे अभियान राबविण्याचे निर्देश देण्यात आले होते.त्या अनुषंगाने स्वच्छता ही सेवा हे अभियान जिल्हा न्यायालय, बीड येथे दिनांक २३ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ठिक ८-०० वाजता मा.श्री.आनंद एल.यावलकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड यांचे मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले.



या स्वच्छता अभियान कार्यक्रमामध्ये संपूर्ण न्यायालयीन परिसराची स्वच्छता ही खराटे, झाडू, टोपले इत्यादी स्वच्छतेसाठी लागणा-या साहित्याचा वापर करून संपूर्ण न्यायालयीन परिसर स्वच्छ करण्यात आला. न्यायालयीन परिसरात साचलेला कचरा, पालापाचोळा यांची साफसफाई यावेळी करण्यात आली. हे स्वच्छता अभियान मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री.आनंद एल.यावलकर यांचे मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले.

सदर स्वच्छता अभियानामध्ये मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री.आनंद एल.यावलकर तसेच बीड मुख्यालयातील इतर सर्व न्यायिक अधिकारी, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष श्री.आर.डी.येवले व त्यांचे सर्व सहकारी पदाधिकारी तसेच इतर विधिज्ञ मंडळी व न्यायालयीन कर्मचारी यांची मोठया संख्येने उपस्थिती होती. उपरोक्त प्रमाणे स्वच्छता ही सेवा उपक्रम राबवून सदर अभियान यशस्वी करण्यात आले.




आमचे लहान बंधु शेख नाजेर यांनी जुने बस स्थानक तलवाडा येथे तारा अमृततुल्य स्पेशल गुळाचा चहा या नावाने नाविन्यपुर्ण व्यावसायाला सुरुवात केली असुन यावेळी सत्कार करुन शुभेच्छा देतांना दैनिक पार्श्वभूमीचे पत्रकार बाप्पु आण्णा गाडेकर, दैनिक लोकनायकचे तालुका विशेष प्रतिनिधि राजेंद्र विटकर, दैनिक दिव्यअग्णीचे पत्रकार शेख आतिखभाई, व शेख जावेद, इत्यादी

# राज्यातील १४ आयटीआयचे नामांतर

## दिघे,मेटे आणि दि.बा.पाटील यांचं दिलं नाव

आज मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मंत्रिमंडळाच्या बैठीक राज्यातील काही आयटीआयचे नामकरण करण्यात आले आहे. या आयटीआयना दि.बा पाटील, बाबासाहेब आंबेडकर, आनंद दिघे, विनायक मेटे यांच नावे देण्यात आली आहेत.

राज्यातील १४ आयटीआयचे नामांतर; दिघे, मेटे आणि दि. बा. पाटील यांचं दिलं नाव

राज्यातील १४ आयटीआयचे नामांतर करण्यात आले आहे. कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी हा निर्णय घेतला असून आयटीआयला नाव देताना सामाजिक व जातीय समीकरणांचा विचार करण्यात आल्याचं देखील त्यांनी म्हटले आहे. ठाण्यातील आयटीआयला धर्मवीर आनंद दिघे यांचे नाव देण्यात आले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर जेथे शिकले त्या एल्फिन्स्टन महाविद्यालयातील आयटीआयला बाबासाहेबांचे नाव देण्यात आले आहे. कोल्हापूरच्या आयटीआयला शाहू महाराजांचे आणि बीडच्या आयटीआयला विनायक मेटे यांचे नाव देण्यात आले आहे. नवी मुंबईतील आयटीआयला दि.बा पाटील यांचे नाव देण्यात आले आहे. याशिवाय लोहगाव विमानतळाचे नाव जगद्गुरु संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ पुणे असे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

धान उत्पादकांना दिलासा देण्यासाठी आता प्रतिक्विंटल चाळीस रुपये अतिरिक्त भरडाई दर देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कुणबीच्या तीन पोटजातींचा इतर मागासवर्ग यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे. जुन्नर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय (विधी व न्याय) सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आलाय. याशिवाय शिरूर ते छत्रपती संभाजीनगर ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्ग यासाठी १४८६ कोटीचा प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे. करदात्यांचे हित लक्षात घेऊन जीएसटी अधिनियमात सुधारणा करण्यात आली आहे.

क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे यांना सूसज्ज क्रीडा सुविधा उभारण्यासाठी वांद्रेतला भूखंड देण्यात येणार आहे. ग्रामसेवक



आणि ग्रामविकास अधिकारी पदांचे एकत्रीकरण करून ग्रामपंचायत अधिकारी पद असं करण्यात आले आहे. राज्यातील सरपंच उपसरपंच यांच्या मानधनात दूप्पट वाढ करण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या वांद्रेतील नव्या संकुलाचे बांधकामाला परवानगी देण्यात आली आहे. हरित हायड्रोजन धोरणात अँकर युनिटची पारदर्शकपणे निवड केली जाणार आहे.

एसटी महामंडळाच्या जमिनी बीओटी तत्वावर विकसित करण्यासाठी दिल्या जाणार आहेत. ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात येणार आहे. राजपूत समाजासाठी वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले जाणार आहे. राज्यातील १४ आयटीआय संस्थांचे नामकरण करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर, नागपूर येथील विधी विद्यापीठांना सात कोटी रूपयांचा निधी देण्यात आला आहे. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना थेट नियुक्ती देण्याच्या निर्णयात सुधारणा करण्यात आली आहे. जलसंपदा कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणीत समावेश केला जाणार आहे. श्रीरामपूर तालुक्यातील मौजे हरेगाव येथील शेती महामंडळाच्या जमिनी मुळ मालकांना परत केल्या जाणार आहेत. दूध अनुदान योजना सुरु राहणार आहे. उत्पादकांना गायीच्या दूधासाठी लीटरमागे सात रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. याशिवाय महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण जाहीर करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, राज्यातील सरपंच आणि उपसरपांचाच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे. ठाण्यातील आयटीआयला धर्मवीर दिघेंचे नाव देण्यात आले आहे. पुणे विमानतळाला संत तुकाराम महाराजांचे नाव देण्यात आसे आहे. सर्वसामान्यासाठी अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. विनायकराव मेटेंचे कार्य मोठे आहेत. त्यामुळे त्यामुळे सरकारकडुन एक छोटासा प्रयत्न म्हणून त्यांचं ही नाव देण्यात आलं आहे.

# ज्या शेतकऱ्यांनी खुर्चीत बसवले तेच शेतकरी पायउतार करणार-राजाभाऊ फड

## परळीत शेतकरी हक्क परिषदेचा भव्य ट्रॅक्टर व बैलगाडी मोर्चा




**परळी (प्रतिनिधी)**

**परळी विधानसभा मतदार संघाचे विद्यमान आमदार आणि राज्याचे कृषिमंत्री यांना राज्यात नेतृत्व करण्याची संधी याच मतदार संघातील शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी बांधवांनी दिली. मात्र जनतेने टाकलेल्या विश्र्वासाचा घात काढण्याचे काम त्यांनी केले. जगमित्र सहकारी साखर कारखाना काढण्याचे आश्वासन दिले मात्र तेही पूर्ण केले नाही, झालेच तर संत जगमीत्र सूतगिरणी चालू स्थितीत असताना बंद पाडली,**

स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी सुरू केलेला वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना बंद पाडला यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे नुकसान झाले. राज्याचे कृषिमंत्री असतांनाही त्यांना या भागातील शेतकऱ्यांच्या समस्या सोडवता आल्या नाहीत. शासन प्रशासनाचा त्यांनी स्वतःच्या सोयीप्रमाणे वापर केला आणि जनतेला वाऱ्यावर सोडून दिले असल्याचा घणाघात राजेभाऊ फड यांनी परळीतील शेतकरी हक्क परिषदेच्या वतीने काढण्यात आलेल्या मोर्चात केला.

सोमवार, दिनांक २३ सप्टेंबर रोजी परळी शहरातून भव्य ट्रॅक्टर व बैलगाडी मोर्चा काढण्यात आला होता. परळी विधानसभा मतदार संघातील हजारो शेतकरी बांधव आपापले ट्रॅक्टर व बैलगाडी घेऊन या मोर्चात सहभागी झाले होते. प्रभू वैद्यनाथ मंदिर येथून या मोर्चाला सुरुवात झाली. हा मोर्चा नेहरू चौक, राणी लक्ष्मीबाई टॉवर, मोंढा मार्केट, एकमिनार चौक, बस स्थानक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मौलाना आझाद चौक मार्गे उपविभागीय अधिकारी कार्यालयावर येऊन धडकला. याप्रसंगी अनेकांची भाषणे झाली. युवक नेते राजाभाऊ फड यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आवाज उठवताना शासन आणि प्रशासनाला चांगलेच फैलावर घेतले. राज्याच्या कृषिमंत्र्यांचा मतदार संघ असूनही हा मतदार संघ विकासाच्या बाबतीत भकास झाला आहे. सततचा दुष्काळ, नेहमीच होणारी अतिवृष्टी आणि शेतीपूरक व्यवसाय बंद पडल्याने बळीराजाचे कंबरडे मोडले आहे. अस्मानी आणि सुलतानी संकटात असलेल्या शेतकऱ्यांच्या दुःखावर मीठ चोळण्याचा प्रताप कृषिमंत्र्यांनी केला असून ज्या जनतेने त्यांना खुर्चीत बसवले आता तीच जनता त्यांना खाली खेचणार यात तिळमात्र शंका नसल्याचा आरोप राजाभाऊ फड यांनी केला.

# शब्बीर अन्सारी यांच्या संघर्षामुळे समाजाला फायदा-माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड (प्रतिनिधी)

समाजातील वंचित आणि गोरगरिबांना आरक्षणाचा फायदा व्हावा या उदात्त हेतूने सामाजिक कार्यकर्ते शब्बीर अन्सारी यांनी ४५ वर्ष संघर्ष केला. त्यांच्या संघर्षाचा फायदा आज समाजाला मिळतो आहे. त्यांच्या कार्याची माहिती समाजाला व्हावी यासाठी या पुस्तकाचा मोठा उपयोग होणार असल्याचे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

बीड येथील रविराज मंगल कार्यालयात ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर अन्सारी यांच्या प्रेरणादायी प्रवासावर आधारित मंडलनामा या पुस्तकाचे वाटप माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मौलाना इकबाल, शब्बीर अन्सारी, शेख जहांगीर, हाजी नसीम इनामदार, सलाम शेख, हाकीम मनियार, नगरसेवक मुखीद लाला, विलास विधाते, जमीलभाई, अॅड. अविनाश काळे, पत्रकार राजेंद्र होळकर, शेख सलाम, अब्दुल काझी, इरफान कुरेशी, खुर्शीद आलम, शेख जाकेर, जमील बागवान, शेख रहेमान आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की,आज खूप महत्त्वाचे काम होत आहे शब्बीर अन्सारी यांनी तब्बल ४५ वर्ष संघर्ष केला त्याचे फायदे समाजाला मिळत आहे. त्यांच्या कार्याची माहिती समाजाला मिळावी या हेतूने हे पुस्तक वाटप होत आहे. मी त्यांच्या प्रत्येक कार्यात सहभागी राहिलो आहे, जेव्हा




मंडल कमिशन स्थापन झाले तेव्हा शब्बीर अन्सारी यांच्या शिफारशींचा देखील विचार झाला म्हणूनच आज समाजातील अनेकांना लाभ मिळत आहे. अन्सारी यांना समाजाचे आशीर्वाद मिळत आहेत, माणुसकीच्या नात्याने सर्वांनी एकत्र राहायला हवे, जाती धर्माच्या नावावर आपणच आपले बांधव तोडत आहोत.पूर्वी दोन चार लोक मोठ्या पदाच्या परीक्षा देत होते आता याची संख्या दसपट झाली आहे हे केवळ आरक्षणामुळेच. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेत ज्या तरतुदी केल्या आहेत त्यानुसार जाती धर्मावर आरक्षण न देता सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणावर सर्वे करून आरक्षण देण्याची शिफारस करण्यात आली आहे असे सांगून त्यांनी शब्बीर अन्सारी यांच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी आभार हाजी शेख जाकिर यांनी मानले. यावेळी मंडलनामा या मराठी आणि उर्दू पुस्तकाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धानाच्या हमी भावाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी जयश्रीताईं जरातेना आमदार करा

## भेंडाळा येथील कार्यकर्ता मेळाव्यात भाई मोहन गुंड यांचे आवाहन

चामोर्शी । प्रतिनिधी

गडचिरोली जिल्ह्यातील मुख्य पीक असलेल्या धानाला हामी भाव मिळवून देण्यासाठी शेतकरी कामगार पक्ष सक्षम आहे. शेकापने शेतकऱ्यांचे आनेक लढे लढले आणि यापुढे ही रामदास जराते सारखे शिलेदार लढत आहेत. सामान्य माणसांच्या प्रश्नांसाठी स्वतःवर केसेस घेवून सातत्याने रस्त्यावरचा संघर्ष करणाऱ्या जयश्रीताई जराते यांना शेतकऱ्यांनी एकत्र येवून आमदार करावे, असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य भाई मोहन गुंड यांनी केले.गडचिरोली विधानसभा क्षेत्राच्या उमेदवार जयश्रीताई जराते यांच्या प्रचार - प्रसाराचे धोरण ठरविण्यासाठी चामोर्शी तालुक्यातील विक्रमपूर - फराडा व भेंडाळा - मुरखळा जिल्हा परिषद क्षेत्रातील शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांचा भेंडाळा येथे रविवार दिनांक २२ सप्टेंबरला कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुख्य मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. पुढे ते म्हणाले की, २०१९ साली धानाला केवळ १८०० रुपये हमीभाव होता. भाई रामदास जरातेंच्या नेतृत्वात गडचिरोली विधानसभा क्षेत्रात एकाचवेळी १४ ठिकाणी शेतकरी कामगार पक्षाने चक्काजाम आंदोलन करुन सरकारला २२०० रुपये हमीभाव देण्यासाठी भाग पाडले. येणाऱ्या निवडणूकीत जयश्रीताईंना येथील शेतकऱ्यांनी आमदार म्हणून विधानसभेत पाठविले तर धानाला ४००० हजार रुपये हमीभाव मिळवून दिल्याशिवाय शेतकरी कामगार पक्ष स्वस्थ बसणार नाही,असे आश्वासन ही भाई मोहन गुंड यांनी यावेळी दिले.शेकापचे रस्ते महामार्ग बाधित शेतकरी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष भाई दिगंबर कांबळे यांच्या हस्ते या कार्यकर्ता मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. सह उद्घाटक म्हणून जयश्रीताई जराते, अध्यक्ष म्हणून शेकाप आदिवासी, भटके - विमुक्त आघाडीचे प्रदेशाध्यक्ष भाई रामदास जराते उपस्थित होते. यावेळी ड निखिल बचुटे, भाई शामसुंदर उराडे (मध्यवर्ती समिती सदस्य) डॉ. गुरुदास सेमस्कर (जिल्हा समिती सदस्य), भाई अक्षय कोसनकर (युवा नेते), कविता ठाकरे (जिल्हाध्यक्ष महिला



आघाडी), गुड्डू हुलके (जिल्हाध्यक्ष युवक आघाडी), अभिलाषा मंडोगडे (जिल्हाध्यक्ष विद्यार्थी आघाडी), भाई पवित्र दास (जिल्हाध्यक्ष कामगार आघाडी), भाई प्रभाकर गव्हारे (जिल्हाध्यक्ष महामार्ग बाधित शेतकरी आघाडी), भाई शर्मीश वासनिक (जिल्हाध्यक्ष शिक्षक आघाडी) तर विशेष अतिथी म्हणून दामोधर रोहनकर, गंगाधर बोमनवार, प्रदिप आभारे, पांडूरंग गव्हारे,चंद्रकांत भोयर सौ. पोर्णिमाताई कांबळे, सौ. साधनाताई बानबले, सौ. पपीताताई सातपुते, डॉ. भाऊराव चौधरी, देवेंद्र भोयर प्रामुख्याने उपस्थित होते.

भाई रामदास जराते व जयश्रीताई जराते यांच्या प्रयत्नाने मौजा मोहुर्ली व सगणापूर येथील ८ ढिवर कुटूंबाना घरकुल मंजूर झाले. यावेळी त्या लाभार्थ्यांना प्रमुख अतिथींच्या हस्ते घरकुलांचे स्मृती चिन्ह देवून सन्मानीत करण्यात आले. कार्यकर्ता मेळाव्याच्या यशस्वीतेकरीता राजु केळझरकर (सगनापूर), मारोती आगरे (मोहुर्ली), देवराव शेंडे (मोहुर्ली), विजय राऊत (वेलतुर तुकूम), कालिदास पोरटे (वाघोली), भैय्याजी कुनघाडकर (भेंडाळा), प्रकाश पाल (फोकुर्डी), मंगेश येनप्रेड्डीवार (फराडा),सुभाष आकलवार (सगनापूर), खुशाल भगत (घारगाव), सगनापूर शाखा - गजानन देवाजी आभारे (चिटणीस), प्रभाकर पोरटे (खजीनदार), श्रावण भोयर (सहचिटणीस), प्रभाकर बोलीवार (सहचिटणीस), मोहुर्ली शाखा अनिल आगरे (चिटणीस), संजय भोयर (खजिनदार), रेवनाथ गेडकर (सहचिटणीस), कवरदेव मंडोगडे (सहचिटणीस), तुकूम शाखा रमेश यम्पलवार (चिटणीस), दिलीप आभारे (खजिनदार), गजानन तिवाडे (सहचिटणीस), रामदास कोहपरे (सहचिटणीस), वाघोली शाखा भोजराज गजानन भोयर (चिटणीस), रोशन मुरलीधर मोंगरकार (खजिनदार), ओमप्रकाश पोरटे (सहचिटणीस), रामचंद्र किरमे (सहचिटणीस), एकोडी शाखा प्रदिप पाल (चिटणीस), दिलीप चंदनखेडे (खजिनदार), विनोद निकुरे (सहचिटणीस), सतिश पाल (सहचिटणीस), भेंडाळा शाखा हेमंत कुंडेकर, सचिन सातपुते, किशोर सुरजागडे, दामाजी सातपुते, घारगाव शाखा अजय भगत, राजीव मंगर, छत्रपती दुरपळे, रमेश मंडोगडे (रामाळा), नितीन चलाख (खंडाळा), दयाकर येलेटीवार यांनी परिश्रम केले.

# चकलांबा पोलिसांची अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांविरोधात मोठी कारवाई!

## सापळा लाऊन चार हायवा घेतले ताब्यात; दिड कोटींचा मुद्देमाल जप्त

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई : तालुक्यातील राक्षसभूवन, सावळेश्वर परिसरातून अवैध वाळूची तस्करी केली जात असल्याची माहिती चंकलाबा पोलिसांना यांना मिळाली होती. यावरुन आज सकाळीच पोलिसांनी सापळा लाऊन चार हायवा ताब्यात घेतले असून, कार्यवाईतील एक हायवा चालक पलायन करण्यात यशस्वी झाला आहे. याबाबत वाळू वाहतूक करणाऱ्या विरोधात गून्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती चकलांबा पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांनी दिली असून, या कार्यवाईत अंदाजे दिड कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आहे.**

चकलांबा पोलिस ठाणे कार्यक्षेत्रातील राक्षसभूवन व सुरळेगाव गोदापात्रातुन अवैध वाळू वाहतूक केली जात असल्याची माहिती चकलांबा पोलिसांना मिळताच ठाणे प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांनी मंगळवार आज सकाळी सहा वाजता सापळा रचून चार हायवा ताब्यात घेतल्या आहेत. ताब्यात घेतलेल्या हायवातील एक हायवा चालक याने पलायन केले असल्याची माहिती आहे. याबाबत चकलांबा पोलिसांत गून्हा दाखल केला आहे. सदरच्या कार्यवाईत अंदाजे दिड कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कारवाईतील वाहने चकलांबा पोलिस ठाण्यात लावण्यात आली आहेत.सदरील कारवाई सहायक पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे,फौजदार अंनता तांगडे,पोलीस हवालदार हनूमान इंगोले, कल्याण पवार,पोलीस शिपाई तुकाराम पवळ, विनोद सुरवसे, किरण मिसाळ, प्रशांत घोंगडे अदीने केली आहे.

# शिवश्री कृषि मंडळाच्या आंदोलनाची दखल: रेल्वे विभागाची बैठक संपन्न

शिरूर । प्रतिनिधी

रेल्वे हे बीड करांचे अनेक वर्षांचे स्वप्न परंतू रेल्वे विभागातील प्रशासकिय अधिकारी,अभियंते यांच्या बेजबाबदार व ढिसाळ नियोजनामुळे शिरापुर, हिवरसिंगा, खोकरमोह, रायमोह परिसरातील शेतकरी नागरिक,विद्यार्थी अनेक वर्षा पासुन त्रास सहन करत आसल्याने शिवश्री कृषि मंडळाच्या वतीने शिवराम राऊत,माऊली शिंदे,विश्वाभर शिंदे,रामेश्वर पांडुळे,विजय शिंदे यांनी लोकशाहीच्या मार्गाने संघर्ष करत आसल्याने जलसमाधी आंदोलन करण्याचा इशारा दिल्याने रेल्वे विभाग व महसुली विभागाने शासकिय विश्रामगृह बीड येथे आ.संदीप श्रीरसागर,मा.आ.सय्यद सलीम यांच्या प्रमुख उपस्थितीत रेल्वेचे प्रमुख अधिकारी,अभियंते, तसेच



महसुली प्रशासनातील उपविभागीय अधिकारी श्री.कुदळे, यांच्या मार्गदर्शनात बैठक संपन्न झाली.यावेळी हिवरसिंगा मलकाचीवाडी येथे रेल्वे वळणरस्त्यावर तब्बल ५ फुटांपर्यंत पाणी साठवून राहिल्याने किमान १० हजार पेक्षा अधिक लोकवस्तीचा रस्ताच बंद होत असल्याने त्या ठिकाणी पूल उभारणे, शेतक-यांचे रेल्वेच्या ताब्यातील क्षेत्राची माहिती प्रकाशित करणे,रेल्वे कामामुळे खराब झालेले रस्ते दुरूस्त करणे,प्रलंबित मावेजा,मुल्यांकन करून आर्थिक नियोजन, तसेच शिरापूर- हिवरसिगा शिवरस्त्यावर पूल उभारणे, या संबंधीचे निवेदन मागण्या सह ,अत्ता पर्यंतच्या निवेदनाच्या प्रती,फोटो आमदार महोदय,व श्री.कुदळे यांना भेट श्री.शिवराम राऊत ( अध्यक्ष-शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगा) यांनी दिले.या बैठकिस मा.जि.प.सदस्य मदन जाधव सर,माऊली सानप(मा.पं.स.सदस्य शिरूर) श्री.दत्तात्रय शिंदे (मा.सरपंच हिवरसिंगा),श्री.चंद्रकांत सस्ते (मा.सरपंच मालकाचीवाडी) डॉ.शिवाजी मिसाळ,अजाज शेख यांच्यासह शिरापूर, मालकाचीवाडी, हिवरसिंगा,बरगवाडी,घुगेवाडी,खोकरमोह, रायमोह परिसरातील शेतकरी यांची उपस्थिती होती.यावेळी आमदार महोदयांनी रेल्वे-महसुल विभागाला कडक शब्दात सुचना करून मागण्या प्रमाणे स्थळ पाहणी व कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.व बैठक संपन्न झाली.

# सौ प्रियंका ताई शिवप्रसाद् खेडकर यांना गेवराई विधानसभेसाठी मुस्लिम बांधवांचा वाढता पाठिंबा

चकलांबा /वार्ताहर

गेवराई विधानसभा मतदारसंघातील महत्त्वाचे समजले जाणारे गाव म्हणजे रसुलाबाद या गावांमध्ये सायंकाळी ७:०० वाजता चकलांबा गावच्या कर्तव्यदक्ष सरपंच सौ प्रियंका ताई शिवप्रसाद खेडकर जनसंवाद मेळाव्याला रसुलाबाद गावातील मुस्लिम बांधवांचा उत्स्फूर्त पाठिंबा दिसून आला. गावातील सर्व मुस्लिम बांधव एकत्र येऊन ढोल ताशा वाजवून प्रियंका ताई खेडकर यांचे जंगी स्वागत केले. या जनसंवाद मेळाव्या च्या बैठकीमध्ये सर्व मुस्लिम बांधव तसेच गावातील महिला भगिनी एकत्र येऊन प्रियंकाताई शिवप्रसाद खेडकर यांनी येणारी विधानसभा निवडणूक लढवावी असा आदेश गावाच्या वतीने दिला. प्रियंका खेडकर ह्या मागील ८ महिन्यापासून चकलांबा गावाच्या सरपंच म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी चकलांबा गावाला मागील काही महिन्यामध्ये विकासाची दिशा दिलेली आहे. चकलांबा या गावाचा गेल्या आठ महिन्यांमध्ये झालेला कायापालट पाहून रसुलाबाद व संपूर्ण परिसर प्रियंका ताई शिवप्रसाद खेडकर यांच्या कार्यावर प्रेरित झाला आहे

प्रियंका खेडकर या इडल इएव असून त्यांचे सासरे श्री भगवान तात्या खेडकर हे ३ वेळेस चे चकलांबा गटाचे सदस्य राहिलेले आहेत. भगवान तात्या खेडकर हे स्व. गोपीनाथ राव मुंढे साहेबांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात.

गावच्या आदेशाला उत्तर देताना प्रियंका खेडकर यांनी



रसुलाबाद गावात असणारे विविध प्रश्न रस्त्याचा,शिक्षणाचा,आरोग्याचा त्याचबरोबर गावात येणारे विविध शासकीय योजना यामध्ये घरकुल योजना च्या माध्यमातून पक्की घरे बांधून देण्याचा, जलसिंचन विहिरी,गाय गोठे अशा विविध प्रकारच्या योजना कसलेही प्रकारचा भ्रष्टाचार न होऊ देता सर्वांचा सर्वांगीण विकास करण्याचा शब्द रसुलाबाद गावकऱ्यांना दिला तसेच तालुक्याने संधी दिली तर गेवराई माजलगाव व बीड तालुक्यातील (सिंदफणा गोदावरी नदीच्या पट्ट्यातील) १लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी प्रयत्न करेल असे सांगितले. तसेच तालुक्यातील सर्व तांडे - वस्त्या २ वर्षामध्ये काँक्रिट रोड ने जोडून देईल असे सांगितलं. तसेच तालुक्यातील प्रत्येक गटाचे व गणाचे गाव एक वर्षात काँक्रिट रोड ने जोडणार असे सांगितले. सर्व समाजातील लोकांचे घरे ५ वर्षात पक्के करण्याचा निर्धार केला. पंचायत समितीत भ्रष्टाचार मुक्त करण्याचा निर्धार व्यक्त केला. प्रियंका ताई च्या निर्णयाचे व दूरदृष्टीचे सर्व समाजातून कौतुक होत आहे व सर्व नागरिक त्यांना आमदार करण्यासाठी तालुका पिंजून काढतील असा शब्द दिला.

# सर्व धर्म समभाव ठेवूनच आपण राजकीय वाटचाल करतो

## माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड (प्रतिनिधी)**

**आपआपल्या कर्मानुसार, धर्मानुसार प्रत्येकजण आचरण करत असतो. देशात तिसरा धर्म म्हणून ख्रिश्चन धर्म आहे. सर्व धर्म समभाव ठेवूनच आपण राजकीय वाटचाल करतो असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. रविवार दि.२२ रोजी बीड शहरातील असेंबलीज ऑफ गॉड चर्च या ठिकाणी ख्रिश्चन समाजाच्या वतीने प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले.**

यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी उपस्थित राहुन सहभाग घेतला. यावेळी



बोलतांना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, आज प्रार्थनेच्या दिवशी मुद्दामहून प्रभुंचरणी नतमस्तक होण्यासाठी आलो. प्रार्थनेत प्रचंड सामर्थ्य असते, आयुष्य जगत असतांना मानववादी विचार घेवून ख्रिश्चन समाज बांधव एकत्रित राहतात. गोर-गरीबांची सेवा करणे, मदत करणे आणि सेवाभाव ठेवून हा समाज पुढे जात आहे. त्याग हा मनातून असावा लागतो. तसा त्याग येंशुने केला आहे. चांगल्यांच्या पाठीशी राहणे या समाजाने ओळखले आहे. माझ्या राजकीय प्रवासात सर्व समाज पुर्ण ताकदीने उभा राहतो याची मला जाणिव आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी कमिटीचे सर्व पदाधिकारी, समाज बांधव उपस्थित होते.

# नागरिकांची काम प्रलंबित ठेवू नका:- तहसीलदार शेळके

**नेकनूर (प्रतिनिधी)**

**प्रशासनाला लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने बीड चे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी चौसाळा महसूल मंडळाची आढावा बैठक आज घेतली. समाजातील सर्व घटकांशी चर्चा करून प्रश्न समजावून घेत सर्व विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना लोकाभिमुख प्रशासन राबवण्यासाठी जनतेचे प्रश्न समजून घ्या. त्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्नशील रहा, नागरिकांची काम प्रलंबित ठेवू नका अशा सूचना यावेळी दिल्या.**

चौसाळा महसूल मंडळातील जनतेच्या अडीअडचणी जनतेत गेल्याशिवाय कळणार नाहीत. प्रश्न कळल्याशिवाय लोकाभिमुख प्रशासन राबवता येणार नाही. हे लक्षात घेऊन चौसाळा ग्रामपंचायत कार्यालयामध्ये जनतेसह सर्व प्रशासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांची आढावा बैठक तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी बोलवली होती. यावेळी बैठकीत ग्रामपंचायत तर्फे तहसीलदार शेळके यांचा सत्कार करण्यात आला. बैठकीत शेतकऱ्यांसह, मजूर, वीज,अनुदान प्रश्न,श्रावण बाळ योजना, ई.के वाय सी, स्वस्त धान्य, मतदार नोंदणी, ई पिक पाहणी, अतिवृष्टी अनुदान, यासारख्या अनेक प्रश्नांची माहिती समाजातील सर्व स्तरातील नागरिकांशी




चर्चा करून घेतली. नागरिकांची समस्या जाणून घेत. तात्काळ संबंधित कर्मचाऱ्यांना प्रश्न निकाली काढण्याच्या सूचना तहसीलदार शेळके यांनी दिल्या.अधिकारी कर्मचारी यांच्यात समोरासमोर चर्चा व निराकरण झाल्यामुळे लोकाभिमुख प्रशासन कसं असतं याची चुणूक आज चौसाळकरांना पाहायला मिळाली.

यावेळी मंडळ अधिकारी जायेभाये, तलाठी शिवराम येवले, तलाठी कमलेश निर्मळ, तलाठी निशा खांडेकर, तलाठी उषा राठोड,चौसाळा जिल्हापरिषद सदस्य अशोक लोढा,चौसाळा ग्रामपंचायत उपसरपंच अंकुश कळासे,मोहन झोडगे,चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर यांच्यासह स्वस्त धान्य दुकानदार, मंडळ कृषी कार्यालयातील कर्मचारी, शिक्षक, चौसाळा ग्रामपंचायत सदस्य, पत्रकार व चौसाळा महसूल मंडळातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रशासनाला लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने बीड चे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी चौसाळा महसूल मंडळाची आढावा बैठक आज घेतली. समाजातील सर्व घटकांशी चर्चा करून प्रश्न समजावून घेत सर्व विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना लोकाभिमुख प्रशासन राबवण्यासाठी जनतेचे प्रश्न समजून घ्या. त्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्नशील रहा, नागरिकांची काम प्रलंबित ठेवू नका अशा सूचना यावेळी दिल्या.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT